# प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र,
# कर्जत-४१०२०१, जि. रायगड

जा.क्र.प्राकृसकें/वरोशा/ठेकापध्दतीने काम/2679/२०२१, दि 29 NOV 2021

## जाहिर प्रसिध्दी (NOTICE)

प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत येथील वनस्पती रोग शास्त्र विभागातील रब्बी हंगामातील शेती विषयक प्रयोगांची तसेच प्रयोगशाळेतील प्रयोगाची कामे करावयाची आहेत कामाची यादी सोबत जोडली आहे. ही कामे निव्वळ कंत्राटी पध्दतीने १५ डिसेंबर २०२१ ते १५ मार्च २०२२ करावयाची आहेत. सदरची कामे करू इच्छुक असणाऱ्या अनुभवी ठेकेदारांनी आपले दरपत्रक या कार्यालयास दिनांक : १३/१२/२०२१ पूर्वी सादर करावे. सोबत कामाच्या अटी व शर्ती आपल्या माहितीसाठी जोडण्यात आलेल्या आहेत.

सहयोगी संशोधन संचालक
प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र,
कर्जत-४१०२०१ जि. रायगड

प्रत : प्रसिध्दीसाठी

१. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, नगर परिषद कार्यालय कर्जत, जि.रायगड,
२. मा. कार्यकारी अधिकारी पंचायत समिती कर्जत, जि.रायगड, यांना माहितीसाठी व योग्य त्या प्रसिध्दीसाठी.
३. मा.तहसिलदार, तहसिल कार्यालय, कर्जत, जि.रायगड यांना माहितीसाठी व योग्य त्या प्रसिध्दीसाठी.
४. नोटीसबोर्ड, प्रादेशिक कृषी संशोधन केंद्र, कर्जत, जि.रायगड.
५.विद्यापीठ संकेतस्थळ

# प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत येथील वनस्पती रोगशास्त्र विभागात प्रयोग शाळेतील व शेती विषयक प्रयोगाची कामे ठेका पध्दतीने करावयाच्या कामाचे दरपत्रक

दिनांक :    /    /२०२१

प्रति,

मा. सहयोगी संशोधन संचालक,
प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र,
कर्जत, जि. रायगड

**विषय** : प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत येथील वनस्पती रोगशास्त्र विभागात रब्बी हंगामातील शेती विषयक प्रयोगाची कामे ठेका पध्दतीने करावयाच्या कामाचे दरपत्रक.

**संदर्भ** : जा.क्र.प्राकृसकें/वरोशा/ठेकापध्दतीने काम/    /    /२०२१, दि.

आपल्या वरील संदर्भित जाहीर प्रसिध्दी पत्रान्वये प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत येथील वनस्पती रोगशास्त्र विभातील शेती विषयक प्रयोगाची कामे ठेका पध्दतीने करावयाच्या कामाचे दरपत्रक खालील प्रमाणे देत आहोत.

| कामाचा तपशिल | वनस्पती रोगशास्त्र विभाग खरीप हंगामासाठी |
|---|---|
| सोबतच्या यादीमध्ये दिलेल्या वनस्पती रोगशास्त्र विभागाच्या शेती विषयक प्रयोगाच्या कामाचे दरपत्रक | (दि.    ते दि.    )<br>रुपये........................<br>अक्षरी ..................... |

मला सर्व अटी व शर्ती मान्य आहेत तरी माझे दरपत्रक मंजूर करावे ही विनंती.

सही : ........................................
नांव : ........................................
पत्ता : ........................................

**प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र,वनस्पती रोग शास्त्र विभाग विभागाच्या विविध प्रयोगांची व प्रयोगशाळेतील करण्यात येणा–या कामांची यादी**

**कालावधी – दि. १५ डिसेंबर २०२१ ते १५ मार्च २०२२**

| | |
|---|---|
| १ | खरीप हंगामातील भात स्वच्छ करून मुख्य भांडारामध्ये ठेवणे. |
| २ | रब्बी हंगामातील कलिंगड पिकावरील शेंडे मर रोगाचे व्यवस्थापन करणे या प्रयोगाचे ले आउट टाकून प्लॉट तयार करणे. |
| ३ | कलिंगड पिकावरील शेंडे मर रोगाचे व्यवस्थापन करणे या प्रयोगाचे आळे तयार करणे. |
| ४ | कलिंगड पिकावरील शेंडे मर रोगाचे व्यवस्थापन करणे या प्रयोगाचे पेरणी करणे. |
| ५ | कलिंगड पिकावरील शेंडे मर रोगाचे व्यवस्थापन करणे या प्रयोगाचे खत, पाणी व तण व्यवस्थापन करणे. |
| ६ | कलिंगड पिकावरील शेंडे मर रोगाचे व्यवस्थापन करणे या प्रयोगाचे औषधाची जिरवणी व फवारणी करणे, निरीक्षणे घेण्यास मदत करणे इ. कामे करणे. |
| ७ | भात विशेषज्ञ यांच्यामार्फत प्राप्त विविध भात वाणांची कडाकरपा रोगाविषयी प्रतिकारक क्षमता तपासणी प्रयोगा संबधित कामे करणे. |
| ८ | खरीप हंगामासाठी भात कल्चर पेरणीसाठी मातीच्या कुंड्या भरणे. |
| ९ | खरीप हंगामातील प्रयोगांसाठी प्रक्षेत्राची स्वच्छता करून ठेवणे, बांध बंदीस्ती करणे. |
| १० | अळंबी तयार करण्यासाठी पेंढा बारीक करून देण्यास मदत करणे. |
| ११ | अळंबी तयार करण्यासाठी बेड भरण्यास मदत करणे. |
| १२ | प्रयोगाची व प्रयोगशाळेतील आयत्यावेळी उद्‌भवणारी कामे पूर्ण करणे तसेच कार्यालय सभोवतालचा परीसर स्वच्छ करणे. |

## हमीपत्र

### ठेक्याबाबतच्या सर्व साधारण अटी व शर्ती

१. प्रक्षेत्रावरील कामे संबधीत विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख विभागाच्या आवश्यकतेनुसार नेमून देतील त्याप्रमाणे करणे आवश्यक राहील.

२. कामाच्या देयकाची अदायगी महिना पूर्ण झाल्यावर केली जाईल. त्यासाठी देयक सादर करतेवेळी विभाग प्रमुख/प्रक्षेत्र अधिक्षक यांचे काम पूर्ण केलेबाबतचा दाखला जोडणे आवश्यक आहे.

३. निविष्टांचा पुरवठा या विभागामार्फत केला जाईल.

४. ठेकेदाराचे स्वतःचे पॅन कार्ड व बँक खाते असणे आवश्यक आहे. तसेच ठेकेदाराने कामगारांना कामाचे वेतन व त्याअनुषंगिक रक्कम संबधित कामगारांच्या बँक खाती जमा करणे आवश्यक आहे.

५. ठेकेदाराने नेमलेल्या मजूरांना शासनाच्या किमान वेतन दरानुसार किमान वेतन दिले जाते असे प्रमाणित करणे आवश्यक आहे.

६. प्रक्षेत्रावरील मालमत्तेची कामगारांकडून नुकसान झाल्यास ठेकेदारास जबाबदार धरले जाईल.

७. ठेक्यामध्ये असलेल्या मजूराव्यतिरीक्त प्रक्षेत्रावर गरजेनुसार जादा मजुर विहीत कार्यपध्दती अवलंबून नेमण्याचा अधिकार संबधीत विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख यांना राहील.

८. ठेक्यातील मजूरांची किमान व कमाल वयोमर्यादा शासन निर्णयानुसार निश्चित केलेली असावी.

९. याचिका क्र. १५९१/२०१८ संदर्भात मा. उच्च न्यायालय मुंबई यांच्या दिनांक १८ एप्रिल २०१८ च्या निर्णयानुसार अंतरिम स्थगितीस अनुसरून परिच्छेद क्र. ५१ ई नुसार याचिकाकर्त्या मजुरांना ठेकेदाराने ठेक्यामध्ये सामावून घेणे आवश्यक आहे.

१०. ठेकेदारामार्फत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या सेवेचे उत्तरदायित्व शासनावर किंवा विद्यापीठ प्रशासनावर राहणार नाही.

११. ठेकेदार व्यक्तिस/संस्थेस उपरोक्त अटी व शर्ती मान्य असल्याचे प्रतिज्ञापत्र सादर करावे लागेल.

१२. ठेक्यासंबधी इतर सर्व अधिकार विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख/विद्यापीठ प्रशासनाला राहतील.

वरील अटी व शर्ती एकतर्फी नसुन त्या मान्य आहेत.

ठिकाणः-

सही ........................

नावः........................